**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १६ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

- **विकसित भारत- रोजगार आणि आजिविका हमी अभियान विधेयक २०२५' लोकसभेत सादर.**
- **महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फिरती आणि स्थायी भरारी पथकं तयार करण्यात येणार असल्याची आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांची पत्रकार. परिषदेद्वारा माहिती.**
- **विजय दिनानिमित्त, १९७१च्या पाकिस्तान विरुद्धच्या युद्धात बलिदान देणाऱ्या सैनिकांना देशभरातून आदरांजली.**
- **१९ वर्षाखालच्या, आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज झालेल्या सामन्यात भारताचा मलेशियावर ३१५ धावांनी विजय.**

**आता सविस्तर बातम्या .......**

रोजगार हमी विधेयक-२०२५

लोकसभेत आज केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी 'विकसित भारत-रोजगार आणि आजीविका हमी अभियान विधेयक २०२५' सादर केलं. हे विधेयक वीस वर्षं जुन्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ मनरेगाची जागा घेईल. हे विधयेक ग्रामीण कुटुंबांना १२५ दिवसांच्या मजुरीच्या रोजगाराची हमी देईल. त्याचबरोबर विकसित भारत २०४७च्या अनुषंगाने एक आधुनिक वैधानिक चौकट तयार करेल. हे मनरेगा विधेयकापेक्षा एक मोठं आणि सुधारित विधेयक असेल. संरचनात्मक त्रुटी दूर करून रोजगार निर्मिती, पारदर्शकता, नियोजन यांना प्रोत्साहन देण्यासाठी हे विधेयक असेल. या नवीन विधेयकाचा उद्देश मजुरांना अधिक हमी, चांगलं वेतन, कामाच्या ठिकाणी संरक्षण तसंच वेतनात अधिक पारदर्शक अंमलबजावणी असल्याचं सरकारने म्हटलं आहे. दरम्यान, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी मनरेगाचं नाव बदलण्याच्या सरकारच्या निर्णयावरून काल जोरदार टीका केली. संपूर्ण जगात ख्याती असलेल्या महात्मा गांधींचं नाव काढून टाकण्यामागे सरकारचा नेमका उद्देश काय आहे, असा प्रश्नही गांधी यांनी विचारला.

मनपा अयुक्त पत्र परिषद

नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी नागपूर शहरामध्ये 24 लाख 83 हजार मतदार असून याकरिता सुमारे 3100 मतदान केंद्र राहणार आहेत .आदर्श आचारसंहितेचे पालन होण्याकरिता फिरते तसच स्थायी भरारी पथकं तयार करण्यात येणार आहे अशी माहिती मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी आज आयोजित पत्रकार परिषदेत दिली. ज्या मतदार याद्यांमध्ये संभाव्य दुबार मतदार नोंदी आहेत त्या संदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे कारवाई करण्यात येईल अशी माहिती आयुक्त चौधरींनी दिली.

या निवडणुकीत उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची मर्यादा 15 लाख असून निवडणूक जाहिरातीच्या प्रमाणिकरणाकरीता मनपा स्तरावर माध्यम नियंत्रण समितीत देखील राहणार असल्याची माहिती आयुक्तांनी दिली. नागपूर महानगरपालिकेसाठी 38 प्रभागातील 151 सदस्यांकरिता ही निवडणूक असणार आहे. उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहतील. अंतिम मतदार यादी काल प्रसिद्ध करण्यात आली. त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या क्षेत्रात 12 लाख 26 हजार 690 पुरुष तर बारा लाख 56 हजार 106 इतकी स्त्री मतदारांची संख्या आहे. प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अंदाजे 18000 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची सेवा घ्यावी लागणार आहे. नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याची प्रक्रिया पारंपारिक म्हणजेच ऑफलाइन पद्धतीने होणार असून निवडणूक विषयक विविध परवानगीसाठी एक खिडकी योजना राबविण्यात येणार आहे.

दुबार मतदार

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने तयार केलेल्या विधानसभा मतदारसंघाच्याच मतदार याद्या वापरल्या जातात. मात्र, त्यातल्या दुबार नावांबाबत, राज्य निवडणूक आयोगाने पुरेपूर दक्षता घेण्याचा प्रयत्न केल्याचं, राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं. महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर दोन स्टार असलेलं चिन्ह नमूद करण्यात आलं आहे. असे मतदार कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करतील, याबाबत स्पष्टता आणण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज भरून घेण्यात आला आहे. असा अर्ज भरू न शकलेल्या उमेदवारांना ,मतदानासाठी केंद्रावर गेल्यानंतर हमीपत्र भरून द्यावं लागेल.

तसंच त्याची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच संबंधित केंद्रावर मतदान करता येईल, असं वाघमारे यांनी काल स्पष्ट केलं.

भाजप मुलाखती

नागपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपकडून इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यास सुरुवात झालेली आहे. नागपुरातील भाजपच्या गणेशपेठ येथील मंगलम कार्यालयात या मुलाखती घेण्यात येत आहे. आतापर्यंत तब्बल 1 हजार 489 इच्छुकांनी भाजपकडे उमेदवारीसाठी अर्ज केला आहे. चार प्रभाग पद्धतीनुसार होणाऱ्या 151 जागांच्या या निवडणुकीत काही प्रभागांमध्ये पाच, तर काही ठिकाणी तब्बल 30 उमेदवार इच्छुक असल्याच चित्र आहे. मात्र अनुभव आणि नव्या जोशाचा समतोल राखत काही माजी नगरसेवकांसह अनेक तरुणांना उमेदवारी देण्याची पक्षाची तयारी असल्याची माहिती  भाजप शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी दिली -

***भारतीय जनता पक्षाचे एकूण तीन  सर्वेक्षण झालेल आहे पहिल्या  सर्वेक्षणामध्ये भाजपची परिस्थिती काय  दुसऱ्या सर्वेक्षणामध्ये काही पक्ष नुट्रलाइझ  झालेला आहे त्याचा काय फायदा होणार आहे काय नुकसान होणार आहे ,फायदा कोणाला होणार आहे या दृष्टीने आणि तिसरा म्हणजे  आमचा उमेदवार कोण असायला पाहिजे  यादृष्टीने  एक सर्वे होणार आहे आणि त्यांच्यातच  विरोधी पक्षाचं कोण उमेदवार होऊ शकते  हे सुद्धा त्या सर्वेचा आमचा  एक भाग राहणार आहे आणि या दोघांच्या  सामंजस्य साधून आम्ही उमेदवारीचा निर्णय घेणार अहोत.***

तसेच, मागील निवडणुकीत जिंकून आलेल्या जागांच्या आधारे महायुतीचा निर्णय घेतला जाईल. अधिक जागांची मागणी झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय पक्षाचे वरिष्ठ नेते घेतील, असही तिवारी यांनी स्पष्ट केल.

चंद्रशेखर बावनकुळे

राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप-महायुती विजयी होईल आणि अनेक ठिकाणी महायुतीचे महापौर असतील, असा विश्वास राज्याचे महसूल मंत्री  चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ५१ टक्क्यांहून अधिक मतांसह महायुती सत्तेत येईल, असा ठाम दावा त्यांनी केला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते. युवा स्वाभिमान पक्ष गेल्या १५

वर्षांपासून महायुतीचा भाग असून, अमरावतीतही महायुतीतूनच निवडणूक लढवली जाणार असल्याच बावनकुळे यांनी सांगितल.

## काँग्रेस मिटिंग

आगामी महानगरपालिका निवडणुकानिमित्त आज मुंबई इथं  नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी, राज्य विधिमंडळातील काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार आणि नागपूरसाठी काँग्रेसचे निरीक्षक रंजीत कांबळे  यांच्या समवेत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी मित्र पक्षांसोबत भक्कम आघाडी, निवडणूक रणनीती आणि सक्षम उमेदवारांची निवड या विषयांवर सखोल आणि  सकारात्मक चर्चा केली. या निवडणुकीत नागपुरात बदल निश्चित असल्याचं ठाकरे यांनी सांगितलं.

## विजय दिवस

आज विजय दिवस आहे. १९७१ला पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात, भारतीय जवानांनी आपलं अतुलनीय शौर्य आणि बलिदान यांच्या बळावर भारताला विजय मिळवून दिला होता आणि त्यानंतर बांगलादेशाची निर्मिती झाली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या विजयात आपलं बलिदान देणाऱ्या सैनिकांना आदरांजली वाहिली आहे. या सैनिकांनी दाखवलेलं शौर्य, पराक्रम आणि मातृभूमीप्रति असलेली त्यांची निष्ठा देशासाठी सदैव प्रेरणादायी राहील, असं राष्ट्रपती आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाल्या.

## विजय दिवस - एनसीसी

'1971 च्या युद्धात भारताला चारही दिशेने संकट असतानाही, भारतीय सैनिकांच्या अदम्य साहसामुळे आपण हे युद्ध जिंकल. या युद्धातील पराक्रमामुळे भारतीय सैन्याचे मनोबल, समर्पण, देशभक्ती आणि अचूक नियोजन याच जगापुढे उदाहरण निर्माण झाल, अशा भावना  विजय दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ,एनसीसी छात्र सैनिकांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या. वर्धा जिल्ह्यातील यशवंत महाविद्यालय देवळी इथं एनसीसी तर्फे विजय दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी एनसीसी छात्र सैनिकांनी '1971 च्या युद्धातील अभिमन्यू' ही

नाटिका प्रस्तुत केली आणि त्यातून परमवीर चक्र विजेते ,लान्स नायक अल्बर्ट एक्का , मेजर होशियार सिंग, सेकंड लेफ्टनंट अरुण क्षेत्रपाल, फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सिंग शेखावत आणि महावीर चक्र विजेते मेजर कुलदीप सिंग चांदपुरी यांची पराक्रम गाथा सादर केली.

आशिया चषक क्रिकेट- एअर/ डेस्क

१९ वर्षाखालच्या, आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत, आज दुबईत झालेल्या सामन्यात भारतानं मलेशिया विरुद्धचा सामना ३१५ धावांनी जिंकला. भारतानं मलेशियापुढं विजयासाठी ४०९ धावांचं आव्हान ठेवलं होतं . मलेशियानं नाणेफेक जिंकून भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारतानं निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून ४०८ धावा केल्या. त्यात अभिज्ञान कुंडूच्या नाबाद २०९ धावांचा मोलाचा वाटा आहे. प्रत्युत्तरात मलेशियाचा संपूर्ण संघ ९३ धावांवर बाद झाला. दीपेश देवेन्द्रन याने सर्वाधिक ५ बळी घेतले.

हवामान

विदर्भात आज गोंदिया इथं आठ पूर्णांक चार दशांश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद झाली. त्या पाठोपाठ नागपूर इथं नऊ पूर्णांक सहा इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. भंडारा आणि यवतमाळ तिथं दहा अंश, गडचिरोली इथं दहा पूर्णांक सहा, वर्धा इथं दहा पूर्णांक आठ आणि वाशिम इथं दहा पूर्णांक दोन इतकं किमान तापमान नोंदवल गेल.

*****